# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील छोटे व्यापारी, फेरीवाले यांच्यासाठी राष्ट्रीय फेरीवाला धोरणाची अंमलबाजणी

**(१) १९८७ (२३-१२-२०१४). श्री. सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील छोटे व्यापारी, फेरीवाले यांच्यासाठी राष्ट्रीय फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करुन मुव्हेबल आर.सी.सी. दुकान गाळे बांधण्यासाठी सर्व विहीत प्रक्रिया करुन सुध्दा अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नियमानुसार कार्यवाही करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी ऑक्टोबर, २०१३ मध्ये मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपालिका यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विषयाबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०२-२०१५) :** (१) नाही.

सुंदर बाग या ठिकाणी पहिल्या टप्प्यामध्ये ३४ फेरीवाले यांना आर.सी.सी. मुव्हेबल गाळे देणेची कार्यवाही सुरु असून संबंधीत फेरीवाल्यांना ना-हरकत दाखले दिले आहेत.

(२) नाही.

जिल्हाधिकारी यांनी ऑक्टोबर, २०१३ मध्ये आदेश दिलेले नाहीत. मात्र दि.६ नोव्हेंबर, २०१३ रोजीचे पत्रान्वये राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ लागू करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही व उपाययोजना करणेबाबत निर्देश दिले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बांधकाम कामगारांच्या धर्तीवर सुतावर सेस लावून राज्यातील यंत्रमाग कामगारांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्याबाबत.**

**(२) १९९१ (२३-१२-२०१४). श्री. सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांधकाम कामगारांच्या धर्तीवर सुतावर सेस लावून राज्यातील यंत्रमाग कामगारांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी कामगार राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन कमिटीने मंडळाचे उत्पन्नाचे स्त्रोत आणि कामगारांच्या कल्याणच्या विविध योजनांच्या शिफारशी माहे नोव्हेंबर २०१३ मध्ये शासनास सादर केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शिफारशी स्विकारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. प्रकाश मेहता (१२-०२-२०१५) :**(१) होय, हे अंशतः खरे आहे.

मा.राज्यमंत्री (कामगार) यांच्या अध्यक्षतेखालील सदरहू समितीने मा.मुख्यमंत्री महोदयांकडे माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये सादर केलेला अहवाल विभागाकडे माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये प्राप्त झाला आहे.

(२) सदरहू समितीने केलेल्या शिफारशी शासनाच्या विचाराधीन आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इचलकरंजी जि.कोल्हापूर येथील केशरी शिधापत्रिकाधारकांना धान्य वितरणाबाबत.**

**(३) १९९३ (२३-१२-२०१४). श्री. सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील केशरी शिधापत्रिकाधारकांना शासन निर्णय दिनांक २२ फेब्रुवारी, २०१२ प्रमाणे किमान १० किलो गहू व ५ किलो तांदूळ असे १५ किलो धान्य वितरीत करण्याची मागणी विधानसभा सदस्य यांनी माहे नाव्हेंबर, २०१४ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धान्य वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. गिरीश बापट (२२-०२-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत लाभ मिळण्यास पात्र नसणा-या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारकांना राज्य शासनातर्फे धान्य पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला होता त्यानुसार सदर शिधापत्रिकाधारकांना माहे मे, २०१४ ते ऑक्टाबर, २०१४ या कालावधीत

धान्य पुरवठा करण्यात आलेला आहे. सदर शिधापत्रिकाधारकांना यापुढील कालावधीसाठी धान्य पुरवठा करण्याबाबत अद्याप शासन स्तरावर निर्णय घेण्यात आलेला नाही.

---

**राज्यात सरकारी गोदामातील कंत्राटी पध्दत रद्द करण्याबाबत**

**(४) २०२१ (२३-१२-२०१४). श्री. हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सरकारी गोदामातील कंत्राटी पध्दत रद्द करण्याबरोबरच इतर मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य हमाल माथाडी महामंडळाने दिनांक ११ फेब्रुवारी, २०१४ रोजी बंद पुकारला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामंडळाच्या मागण्या कोणकोणत्या आहेत,त्यापैकी कोणकोणत्या मागण्या मान्य केल्या आहेत,

(३) उर्वरित मागण्यांबाबत केव्हा निर्णय घेण्यात येणार आहे?

**श्री. गिरीश बापट (११-०२-२०१५) :** (१) शासकीय गोदामातून कंत्राटी हमाल पध्दत बंद करणे व अन्य मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य हमाल माथाडी महामंडळाकडून दिनांक ११ फेब्रुवारी, २०१४ रोजी बंद पुकारला गेला नव्हता. तथापि, आझाद मैदान, मुंबई येथे धरणे आंदोलन केले होते.

(२) व (३) महाराष्ट्र राज्य हमाल माथाडी महामंडळाच्या मागण्या पुढीलप्रमाणे आहेत-

(१) कंत्राटी हमाली पध्दत सरकारी गोदामातून त्वरित रद्द करावी.

(२) राज्यात माथाडी कायद्याची कठोर अंमलबजावणी करावी.

(३) माथाडी मंडळावर आवश्यक अधिका-यांच्या पूर्णवेळ नियुक्त्या कराव्यात.

(४) माथाडी कामगारांना कायद्यानुसार प्रो.फंड इत्यादी सामाजिक सुरक्षा मिळावी.

(५) वन मॅन बोर्ड संपुष्टात आणून ख-या हमाल कार्यकर्त्यांच्या नियुक्तीसह प्रातिनिधिक मंडळाचा कारभार सुरू करावा.

महाराष्ट्र राज्य हमाल माथाडी महामंडळाच्या उपरोक्त मागण्यांपैकी मागणी क्र.१ बाबत या विभागाकडून सन २०१४-२०१७ या कालावधीसाठी राज्यातील सांगली, बीड, वर्धा, बुलढाणा, उस्मानाबाद, वाशिम व रत्नागिरी या ७ जिल्हयांमध्ये अन्नधान्य हाताळणुकीची कंत्राटी पध्दत रद्द करून त्याऐवजी जिल्हाधिकारी/जिल्हा पुरवठा अधिकारी यांना मालक म्हणून माथाडी मंडळाकडे नोंद करणे व त्यानुसार माथाडी मंडळाकडून कामगार घेण्याची कार्यपध्दती प्रायोगिक स्तरावर लागू करण्याबाबतची कार्यवाही प्रगतिपथावर आहे, तर उर्वरित मागण्यांवर कामगार विभागांकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**पुणे जिल्ह्यात अंगणवाडी सेविका व मदतनीस महिलांच्या मुलांना थकीत रकमेसह शिष्यवृत्ती देण्याबाबत**

**(५) २०२६ (२२-१२-२०१४). श्री. हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात केंद्र व राज्य शासनाकडून अंगणवाडी सेविका व मदतनीस महिलांच्या मुलांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती गत सात वर्षापासून देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) सदर शिष्यवृत्ती रक्कम थकीत रक्कमेसह देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०३-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी सेविका/मदतनीस यांची माहिती बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या स्तरावर प्राप्त करुन ती. माहिती प्रबंधक, भारतीय जीवन बीमा निगम शिवाजीनगर, पुणे यांना जिल्हा परिषद पुणे यांचे कार्यालयाचे पत्र जा.क्र. जि.प./एबाविसेयो/सां/४६१/१३, दि.०७.०२.२०१३ रोजी सादर केली आहे. भारतीय जीवन बीमा निगम कडून या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी आयडी कोड प्राप्त झालेले आहेत व सध्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे पाल्यांना देण्यात येणारे शिष्यवृत्ती प्रस्तावांचे संकलन करुन पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) अंगणवाडी सेविकास व मदतनीस यांच्या पाल्यंना देण्यात येणा-या शिष्यवृत्ती प्रस्तावांचे संकलन करुन भारतीय जीवन निगमकडे पाठविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**शासनाच्या विविध विभागाला वितरीत केलेल्या निधीबाबत**

**(६) २०२८ (२२-१२-२०१४). श्री. हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक ३१ मार्च, २०१४ पर्यंत राज्य शासनाच्या विविध विभागाला वितरीत केलेला निधी पैकी ७१ हजार ५६३ कोटी रुपयांचा खर्चाची प्रमाण पत्रे अद्याप पर्यंत वित्त विभागास प्राप्त झाली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच १९९० पासून अशा प्रकाराच्या १०२९ कोटी २७ लक्ष रुपयांच्या खर्चाची बिले विविध विभागाकडून अद्याप पर्यंत प्राप्त झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने संबंधित विभागातील जबाबदार अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही केली, तसेच सदरील प्रमाणपत्रे त्वरीत सादर करण्यासाठी काय उपाययोजना करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०१-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) प्रलंबित संक्षिप्त देयके व उपयोगिता प्रमाणपत्रे यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून तरीही प्रलंबितता राहिल्यास प्रशासकीय विभागांना संबंधित विभागातील जबाबदार अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत वित्त विभागाच्या क्र.म.आख-२०१४ /प्र.क्र. ४२/विनियम, दि. ९.१०.२०१४ रोजीच्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सदर प्रलंबितता कमी करण्याकरीता सचिव (ले.व को.) वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दर महिन्याला मंत्रालयीन विभागांनी नियुक्त केलेल्या नोडल अधिका-यांसमवेत बैठक घेण्यात येते. तसेच, वित्त विभागाकडे प्राप्त होणा-या (संक्षिप्त देयके / सहायक अनुदान) व्ययविषयक अनौपचारिक संदर्भाच्या धारिकेत वित्त विभागाकडून सदर प्रलंबितता कमी करण्याच्या सूचना वेळोवेळी देण्यात येत असतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील सायबर गुन्ह्यांत तिप्पट वाढ झाल्याबाबत**

**(७) २०३० (२२-१२-२०१४). श्री. मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी मुंबईतील सायबर गुन्ह्यांत तिप्पट वाढ झाल्याचे नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या अहवालात नुकतेच आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालानुसार या गुन्ह्याचे प्रमाण कमी करण्याकरिता कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०२-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये जनजागृती होणेच महत्वाचे असून त्याप्रमाणे मुंबई पोलीस व सायबर पोलीस ठाणेकडून स्थानिक पोलीस ठाणे यांनी शाळा, कॉलेजेस मध्ये जाऊन सायबर गुन्ह्यांना कसे बळी पडू नये याबाबत मार्गदर्शन केले आहे. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या स्थरांवर सायबर कार्यशाळेचे आयोजन वेळोवेळी करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे दरवर्षी २ जानेवारी हा “रायझिंग” डे व २ जानेवारी ते ८ जानेवारी हा सप्ताह “रायझिंग सप्ताह” म्हणून साजरा करण्यात येतो. या सप्ताहा दरम्यान सायबर जनजागृती चे कार्यक्रम व कार्यशाळांमार्फत विविध शाळा, कॉलेजेस, पोलीस ठाणे, परिमंडळ पातळीवर, कार्पोरेट क्षेत्रात सायबर गुन्ह्यांबाबत दक्षता घेण्याबाबत सर्वसामान्यांना वेळोवेळी अवगत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्यातील पॅरोलवर बाहेर पडून पलायन केलेल्या कैद्यांची संख्या**
**इतर राज्याच्या मानाने अधिक असल्याबाबत**

**(८) २०३१ (२२-१२-२०१४). श्री. मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)राज्यात सन २०१३ मध्ये कारागृहात शिक्षा भोगत असतांना पॅरोलवर बाहेर पडून पलायन केलेल्या कैद्यांची संख्या देशातील इतर राज्याच्या मानाने अधिक असल्याचे नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो च्या आकडेवारीतून माहे नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०२-२०१५) :**(१) हे खरे नाही.

नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्यूरो यांच्या सन २०१३ च्या आकडेवारी मध्ये राज्यातील कारागृहामधून पॅरोल रजेवर बाहेर पडून पुर्वीपासून फरार झालेल्या एकूण बंद्याची संख्या ३०५ दर्शविण्यात आलेली आहे, परंतु प्रत्यक्षामध्ये सन २०१३ मध्ये राज्यातील कारागृहामधून पॅरोल रजेवरुन फरार बंदी संख्या ६४ इतकीच आहे व ती इतर राज्यातील फरार बंदी संख्येसारखीच आहे.

(२) पॅरोल रजेवरील फरार बंद्यांवर दिनांक १९ जुलै, २०१३ पासुन भादवि २२४ नुसार कारवाई चालू करण्यात आली आहे. त्याचा चांगला परिणाम झाला असुन अशी कारवाई चालू केल्यापासून दिनांक ३१.१०.२०१४ अखेर स्वतः व पोलीसांमार्फत एकूण २१३ फरार बंदी कारागृहात दाखल झाले आहेत, तसेच रजेवर मुक्त होवून फरार होणा-या बंद्याचे प्रमाणात देखील सदर कारवाईमुळे घट झाली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याला टोल मुक्त करण्याबाबत दिलेले आश्वासन**

**(९) २०३३ (२२-१२-२०१४). श्री. मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याला टोल मुक्त करु असे आश्वासन शासनाने दिले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तदनुषंगाने या आश्वासनाची पूर्तता करण्याकरिता कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, आतापर्यंत राज्यातील किती व कोणत्या जिल्हयातील व तालुक्यातील रस्ते टोलमुक्त केले आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०३-२०१५) :** (१) नाही.
(२) व (३) खाजगीकरणांवरील प्रकल्पांच्या आणि पथकर स्थानकांच्या अडचणींबाबत दि.५ डिसेंबर, २०१४ रोजी अभ्यासगट समिती स्थापन करण्यात आलेली आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासनस्तरावर सर्व बाबींचा विचार करुन कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भुसावळ (जि.जळगांव) येथे बोगस रेशनकार्ड असल्याबाबत.**

**(१०) २०४६ (१५-०१-२०१५). श्री. चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ (जि.जळगांव) येथे २६५५ बोगस रेशनकार्ड असल्याची तक्रार दि. २५ ऑगस्ट, २०१३ रोजीच्या सुमारास शासनाकडे करण्यात आली होती, त्यानुसार शासनाने दोन दिवसांत चौकशी करुन अहवाल पाठविण्यासाठी आदेश दिले होते हे ,खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आदेशानुसार अद्यापर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. गिरीश बापट (१०-०२-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर तक्रारींच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी करुन स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याच्या सूचना जिल्हा पुरवठा अधिकारी, जळगाव यांनी उप विभागीय अधिकारी, भुसावळ यांना दिल्या आहेत.
तसेच, शासन निर्णय दि.२६.०८.२०१३ मधील तरतुदींनुसार, प्राथमिक चौकशीत तथ्य आढळून आल्यास संबंधीत अधिकारी /कर्मचारी यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये शिस्तभंगविषयक कारवाई करण्याच्या सूचना देखील संबंधतीस देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भुसावळ येथील स्वस्त धान्य दुकानदार श्री.सुरेश बंडू सन्सासे यांचे विरुध्द तहसिलदार भुसावळ यांचेकडे चौकशी प्रलंबित असल्याबाबत**

**(११) २०५२ (१५-०१-२०१५). श्री. चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ येथील स्वस्त धान्य दुकानदार श्री.सुरेश बंडू सन्सासे यांचे विरुध्द तहसिलदार भुसावळ यांचेकडे पत्र क्र. पुरवठा /चौकशी/कावि/२९१८६/२०१४ दिनांक ३० जून, २०१४ अन्वये चौकशी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीअंती काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१२-०२-२०१५) :** (१) होय.
(२) श्री.सुरेश बंडू सनांसे, रास्तभाव दुकान परवानाधारक यांच्याविरुध्द तहसिलदार, भुसावळ यांचेकडे एकुण सात तक्रारी प्राप्त झाल्या. त्यापैकी २ तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या आहेत. ३ तक्रारी मध्ये जिल्हा पुरवठा अधिकारी, जळगांव यांनी तहसिलदार भुसावळ, यांचा फेर चौकशी अहवाल मागविला असुन, उर्वरित २ तक्रारीची तहसिलदार भुसावळ यांच्या स्तरावर चौकशी सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयात सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात मनरेगा अंतर्गत करण्यात आलेली विकास कामे

**(१२) २०६५ (२३-१२-२०१४). श्री. चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयात सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात मनरेगा अंतर्गत ४० कोटी रुपयांच्या विकास कामाचे उद्दीष्ट असतांना त्यापैकी ८.३३ कोटीं रुपयांचीच कामे पूर्ण झाली आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच नोंदणीकृत ६० हजार ग्रामरोजगार सेवकांपैकी केवळ २०० कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार योजनेच्या अपयशास जबाबदार असणा-यां संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०२-२०१५) :** (१) नाही.
कोल्हापूर जिल्हयात सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात मनरेगा अंतर्गत ४३.३३ कोटी रुपयांचे लेबर बजेट मंजूर करण्यात आले होते. माहे ऑक्टोबर २०१४ मध्ये २३.३२ कोटीचे सुधारित लेबर बजेट मंजूर करण्यात आले. त्यापैकी ८.४० कोटी रुपयांची कामे झालेली आहेत.
(२) नाही.
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत आजपर्यंत १,७६,८४४ कुटुंबांची नोंदणी झाली आहे व ३,०७,७२३ मजूरांची नोंदणी करण्यात आलेली आहे. तसेच कोल्हापूर जिल्हयात १०२९ ग्रामपंचायतीमध्ये प्रत्येक ग्रामपंचायतीस एक याप्रमाणे १०२९ ग्रामरोजगार सेवक आहेत. सध्या ८५ कामावर १२२२ मजूर कार्यरत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा, पन्हाळा व शाहूवाडी तालुक्यामध्ये पशुधन आरोग्यासाठी लागणारी पशुधन विकास अधिका-यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१३) २०६६ (२७-०१-२०१५). श्री. चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा, पन्हाळा व शाहूवाडी तालुक्यामध्ये पशुधन आरोग्यासाठी लागणारी पशुधन विकास अधिका-यांची ४३ पद रिक्त असून पशुधन आरोग्यासाठी लागणारी यंत्रणा त्यामुळे कोलमडली आहे आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यात पशुधनाच्या संख्येनुसार पशुवैद्यकीय दवाखान्यांची संख्या कमी आहे, चार ते पाच गांवासाठी एकच उपकेंद्र असून एका पशुधन अधिका-यांकडे दोन ते तीन दवाखान्यांचा कार्यभार सोपविण्यात आला आहे, हे ही खरे आहे का,
(३) असल्यास, पशुधन विकास अधिका-यांच्या रिक्त पदांमुळे पशुधनाचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरच्या रिक्त जागा भरणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही,
कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा, पन्हाळा व शाहुवाडी या तीन तालुक्यामध्ये पशुधन विकास अधिकारी संवर्गाची १६ पदे मंजूर असून ४ पदे भरलेली व १२ पदे रिक्त आहेत सदर रिक्त पदाचा कार्यभार नजीकच्या पशुधन विकास अधिकाऱ्यांना देण्यात आला असून पशुपालकांना नियमितपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही

राज्यामध्ये शासन धोरणानुसार ५००० पशुधनामागे एक पशुवैद्यकीय दवाखाना मंजूर आहे त्यानुसार कोल्हापूर जिल्ह्यात पशुवैद्यकीय दवाखान्यांची संख्या निश्चित करण्यात आली आहे. रिक्त पदाचा कार्यभार नजीकच्या पशुधन विकास अधिकाऱ्यांना सोपविण्यात आला आहे हे खरे आहे.
(३) नाही.

रिक्त असलेल्या पदांचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या पशुधन विकास अधिकाऱ्यांना देण्यात येऊन पशुपालकांना पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत व याबाबत पशुपालकांकडून कुठल्याही प्रकारच्या तक्रारी प्राप्त नाहीत.
(४) पशुसंवर्धन खात्यात रिक्त असलेली पशुधन विकास अधिकारी गट-अ संवर्गाची एकूण ३७२ पदे भरण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र सादर करण्यात आले असून

त्यानुसार आयोगाद्वारे परिक्षा घेण्यात आली आहे. आयोगाकडून शिफारस पात्र उमेदवारांची यादी प्राप्त होताच कोल्हापूर जिल्ह्यातील पशुधन विकास अधिकारी गट-अ संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

---

**गगनबावडा (जि.कोल्हापूर) येथे रेशनकार्डाअभावी केंद्र शासनाच्या राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्णांना उपचार मिळत नसल्याबाबत**

**(१४) २०६९ (२२-१२-२०१४). श्री. चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गगनबावडा (जि.कोल्हापूर) येथे रेशनकार्डाअभावी केंद्र शासनाच्या राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्णांना उपचार मिळत नसल्याने कोल्हापूर जिल्हा पूरवठा विभागाच्या भ्रष्ट यंत्रणेचा फटका नागरिकांना बसत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेशनकार्डाअभावी या योजनेपासून वंचित असणारे कोल्हापूर जिल्ह्यातील नागरिक व राजीव गांधी जीवनदायी योजनेतून उपचार घेवू इच्छिणारे रुग्ण तीव्र आंदोलन करण्याच्या पावित्र्यात आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राजीव गांधी जीवनदायी योजनेतून उपचार घेवू इच्छिणा-या रुग्णांना उपचार मिळण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीश बापट (२८-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील अपंग व त्यांचे कुटूंबियांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेच्या अंत्योदय योजनेतील धान्य देण्याबाबत**

**(१५) २०७० (२२-१२-२०१४). श्री. चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपंग व्यक्ती कायद्यातील तरतुदीनुसार व राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेनुसार राज्यातील अपंग व त्यांचे कुटुंबाला अंत्योदय योजनेअंतर्गत मासिक ३५ किलो धान्य देण्यात येते, परंतू उक्त योजनेतील धान्य कोल्हापूर जिल्ह्यातील अपंग व त्यांचे कुटूंबियांना देण्याबाबत टाळाटाळ केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत राज्य अपंग बेरोजगार व पुर्नवसन संस्थेने शासनाकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (२२-०१-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत कोल्हापूर जिल्हा यातील अपंग व त्यांच्या कुटुंबियांना अंत्योदय योजनेअंतर्गत प्रतिशिधापत्रिका दरमहा ३५ किलो धान्याचे वाटप करण्यात येते.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विनाअनुदानित शाळा अनुशेषाच्या निकषामुळे अनुदानापासून वंचित राहिल्याबाबत**

**(१६) २०७६ (२२-१२-२०१४). श्री. चंद्रदीप नरके (करवीर), डॉ. सुधाकर भालेराव (उदगीर), श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री. उल्हास पाटील (शिरोळ), डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री. दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विनाअनुदानित शाळा व तुकडयांचा (इंग्रजी माध्यम वगळून) शैक्षणिक वर्ष २००९-१० मध्ये “कायम” शब्द काढल्यानंतर माहे एप्रिल, २०१२ मध्ये वा त्यासुमारास मुल्यांकन करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निकषामध्ये जाचक अटी असल्याने शाळा अनुदानापासून वंचित राहिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शाळातील सर्व कर्मचारी सन २००० पासून विनावेतन काम करीत असून त्यांना शासनाचे वैयक्तिक मान्यता आदेश आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने मान्यता दिलेल्या व अनुशेषाच्या निकषामुळे अपात्र ठरत असलेल्या व गत १० ते १२ वर्षे अखंड विनावेतन सेवा करत असलेल्या शाळांमधील कर्मचाऱ्यांना निकषातील जाचक अटी वगळून शासनाने अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२१-०२-२०१५) :**(१) होय.
(२), (३), (४) व (५) राज्यातील कायम शब्द काढलेल्या शाळा अनुदानावर आणण्यासाठी दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ रोजी मुल्यांकनाचे निकष तयार करण्यात आले. सदर मुल्यांकनाचे निकष शासनाने दिनांक १६ जुलै, २०१३ अन्वये सुधारित केलेले आहेत. त्यानुसार शाळा अनुदानास पात्र घोषित करण्यात येतात. पात्र शाळांना निधीच्या उपलब्धतेनुसार वेतन तरतूद करण्यात येते.

---

**बाजारभोगांव (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील जिल्हा परिषदेच्या पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुधन विकास अधिकारी यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(१७) २०८० (२२-१२-२०१४). श्री. चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाजारभोगांव, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील जिल्हा परिषदेच्या पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुधन विकास अधिकारीं हे पद सन २००३ पासून गेली १० वर्षे रिक्त असून पन्हाळा तालुक्यातील मौजे कळे व पडळ या दोन पशुवैद्यकीय दवाखान्यातील अधिका-यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जवळ-जवळ २१ गावांचे कार्यक्षेत्र असणा-या बाजारभोगांव, ता.पन्हाळा येथील दवाखान्यामध्ये घटसर्प, जंत निर्मुलन, कृत्रिम रेतन, लाळ खुरकत, वैरण व्यवस्थापन या सारख्या सुविधा जनावरांना मिळत नाही, हे ही खरे आहे का,

(३) असल्यास, नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी जि.प.कोल्हापूरकडे वारंवार मागणी करूनही अद्याप सदर रिक्त पदे शासनाने भरली नाहीत, हे ही खरे आहे का,

(४) असल्यास, सदरील पदे भरणेबाबत शासनाने त्वरीत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०२-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही, रिक्त असलेल्या पदाचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या पशुधन विकास अधिका-यांना देण्यात येऊन कामकाज करुन घेतले जात असून पशुपालकांना नियमितपणे पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत व याबाबत पशुपालकाकडून कुठल्याही प्रकारच्या तक्रारी प्राप्त नाहीत.

(३) व (४) पशुसंवर्धन खात्यात रिक्त असलेली पशुधन विकास अधिकारी गट - अ संवर्गाची एकूण ३७२ पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र सादर करण्यात आले असून त्यानुसार आयोगाद्वारे परिक्षा घेण्यात आली आहे. आयोगाकडून शिफारस पात्र उमेदवारांची यादी प्राप्त होताच कोल्हापूर जिल्हयातील पशुधन विकास अधिकारी गट- अ संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

---

**कोल्हापूर येथील विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालयामध्ये जात प्रमाणपत्र पडताळणी अर्ज प्रलंबित असल्याबाबत**

**(१८) २०८३ (२२-१२-२०१४). श्री. चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्हयांकरिता असणा-या कोल्हापूर येथील विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालयामध्ये माहे ऑक्टोबर, २०१४ अखेर पडताळणीची तीन हजार प्रकरणे प्रलंबीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तीन हजार प्रकरणापैकी विद्यार्थ्यांचे एक हजार व कुणबी, कसाई, दर्जी वाणी, सोनार, जुल्हा, धावड या जातीची तीन हजार प्रकरणे दक्षता पथकाकडून अहवाल मिळूनही समितीने अद्याप प्रकरणांवर निर्णय घेतलेला नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यार्थ्यांचे शालेय नुकसान टाळण्याकरिता व शासकीय नोकरीकामी पडताळणीसाठी पाठवलेले प्रस्तावांना तात्काळ पडताळणी प्रमाणपत्र देणेबाबत शासन विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, कोल्हापूरला आदेश देणार आहे काय ?

**श्री. राजकुमार बडोले (१७-०३-२०१५) :**(१) कोल्हापूर येथील विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे माहे ऑक्टोबर, २०१४ अखेर १४८०२ प्रकरणे प्रलंबित होती.
(२) नाही.
सदर कार्यालयाकडे माहे ऑक्टोबर, २०१४ अखेर दक्षता पथक अहवाल एकूण १११७ प्रकरणे प्राप्त झाली होती. ऑक्टोबर ते डिसेंबर, २०१४ मध्ये निकाली काढलेल्या प्रकरणांपैकी ८४ दक्षता पथकाकडील प्रकरणे निकाली काढलेली आहेत. प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकाली काढण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) शासनाने आता जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या स्थापन केल्या असल्याने प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकाली काढण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

### राज्यात टेक्सटाईल पार्क सुरु करणेबाबत

**(१९) २०८९ (२२-१२-२०१४). श्री. भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कापूस उत्पादन लक्षांत घेता शासनाने टेक्सटाईल पार्क सुरु करण्याचे धोरण आखले आहे, हे खरे आहे काय,
(२) त्यानुसार राज्यात टेक्सटाईल पार्क सुरु झाले काय, असल्यास, त्याचे स्वरुप काय ?
(३) असल्यास, राज्यात टेक्सटाईल पार्क सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-०२-२०१५) :** (१) होय, अंशतः खरे आहे.
टेक्सटाईल पार्क उभारणीची योजना केंद्र पुरस्कृत योजना असून सदरची योजना संपूर्ण देशात राबविण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून एकूण प्रकल्प किंमतीच्या ४० टक्के रक्कम किंवा रु.४० कोटी यापैकी जी रक्कम कमी असेल तितकी रक्कम अनुदान म्हणून उपलब्ध करुन देण्यात येते.
(२) व (३) सदर एकात्मिक वस्त्रोद्योग संकुल उभारणी योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून

राज्यात एकूण १२ टेक्सटाईल पार्क मंजूर असून त्यापैकी ७ टेक्सटाईल पार्क सुरु झालेले आहेत व ५ टेक्सटाईल पार्क उभारणीखाली आहेत. राज्यात केंद्र शासनाच्या टेक्सटाईल पार्क योजनेला प्रोत्साहन देण्याकरीता टेक्सटाईल पार्क प्रकल्प किंमतीच्या ९ टक्के किंवा रु.९.०० कोटी यापैकी जी कमी असेल ती रक्कम अनुदान स्वरुपात देण्यास राज्य शासनाने दिनांक २५ मे, २०१२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठवाड्यास समन्यायी पध्दतीने पाणी वाटपाची अंमलबजावणी करणेबाबत

**(२०) २०९० (२२-१२-२०१४). श्री. भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यास समन्यायी पध्दतीने पाणी वाटपासाठी जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाने कायद्यान्वये अंमलबजावणी करणेबाबत औरंगाबाद उच्च न्यायालयाने मा.मुख्यमंत्री व मा.मुख्य सचिवांना नोटीस बजावली, हे खरे आहे काय,
(२) प्रत्यक्ष समन्यायी पध्दतीने पाणी वाटपासाठी कायदा व नियमांची अंमलबजावणी करणेबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०३-२०१५) :** (१) उर्ध्व गोदावरील खो-यातील पाण्याचा समन्यायी पध्दतीने पाणी वाटप होण्याबाबतव जायकवाडी धरणात उर्ध्व धरणातून मराठवाड्यास समन्यायी पध्दतीने पाणी सोडणेबाबत मराठवाडा जनता विकास परिषद, औरगाबाद यांनी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद येथे सन २०१२ मध्ये जनहित याचिका दाखल केली होती. तद्नंतर या संदर्भात उर्ध्व भागाकडील व निम्न भागाकडील जनहित याचिका मा.उच्च न्यायलय, मुंबई येथे दाखल केल्या होत्या. या सर्व याचिकांची एकत्रितरित्या सुनावणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे घेण्याचा निर्णय घेण्यात आला व त्यानुसार सद्यःस्थितीत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे कार्यवाही सुरु आहे.
(२) मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांनी सर्व याचिकाक-यांची बाजु एकून दिन. १९/०९/२०१४ रोजी समन्यायी पध्दतीने पाणी वाटपाकरिता मार्गदर्शक सुचना सकट निर्णय दिला. या निर्णयाच्या अनुषंगाने गोदावरी खोऱ्याच्या उर्ध्व भागाकडील धरणांमधुन जायकवाडी धरणाकरिता काही प्रमाणात पाणी सोडण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार डिसेंबर, २०१४ मध्ये मुळा धरण समुहातून १०२.२३ द.ल.घ.मी. व प्रवरा धरण समुहातून ९०.५३. द.ल.घ.मी. इतके पाणी जायकवाडी धरणाकरिता सोडण्यात आले व त्यामुळे जायकवाडी धरणात एकूण १३९.५४ द.ल.घ.मी. इतके पाणी प्राप्त झाले.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद येथील घाटी रुग्णालयात औषधांचा होत असलेला तुटवडा

**(२१) २०९७ (२२-१२-२०१४). श्री. भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील घाटी रुग्णालयात बहुतांशी सर्वत्र औषधाचा तुटवडा असून त्यामुळे सर्वच रुग्णांना खाजगी मेडिकलमधून न परवडणा-या किंमतीत औषधे खरेदी करावी लागल्याने तसेच सदर रुग्णालयामध्ये सोयीसुविधा व स्वच्छतेचा अभाव असल्याने रुग्णांची तसेच नातेवाईकांची गैरसोय होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२३-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) लागु नाही.

---

## राज्यातील ग्रामपंचायतीकडून मालमत्ता कराच्या आकारणीला मुंबई उच्च न्यायालयाने घटनाबाह्य ठरवले असल्याबाबत.

**(२२) २१०५ (२२-१२-२०१४). श्री. भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामपंचायतीकडून मालमत्ता कराच्या आकारणीला मुंबई उच्च न्यायालयाने घटनाबाह्य ठरवले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामपंचायतीच्या आर्थिक सक्षमतेसाठी कोणती पर्यायी उपाययोजना शासनाने कार्यान्वित केली आहे,
(३) याबाबत कार्यवाहीची थोडक्यात माहिती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०२-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ग्रामपंचायतीच्या हद्दीतील मालमत्तेवर सुधारीत करप्रणाली अस्तित्वात आणण्याकरीता शासन निर्णय, दिनांक ०९ जानेवारी, २०१५ अन्वये अभ्यासगट स्थापन करण्यात आला आहे.

---

**राष्ट्रीय विकास योजनेअंतर्गत राज्यातील ग्रामपंचायतीना ब्रॉण्डबॅड कनेक्टीव्हीटीने जोडण्याबाबत**

**(२३) २१०६ (२२-१२-२०१४). श्री. भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय विकास योजनेअंतर्गत राज्यातील ग्रामपंचायतीना ब्रॉण्डबॅड कनेक्टीव्हीटीने जोडण्याबाबत शासन निर्णयान्वये ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिवांनी सर्व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी मुख्याधिका-यांना आदेश दिलेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर, गंगापूर तालुक्यात काय कार्यवाही झाली आहे,
(३) कार्यवाही सुरु नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,
(४) प्रत्यक्ष किती कालावधी कार्यवाही पूर्ण होईल ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०३-२०१५) :**(१) होय.

केंद्रशासनाने नॅशनल ऑप्टीकल फायबर नेटवर्कद्वारे देशातील २५,००० ग्रामपंचायतींना ब्रॉडबॅण्ड कनेक्शन उपलब्ध करुन देण्याची राष्ट्रीय विकास योजना हाती घेतली आहे. त्यात राज्यातील सर्व २८००६ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. यासाठी केंद्रशासन, राज्यशासन व बी.बी.एन.एल. कंपनीमध्ये दिनांक १२ एप्रिल, २०१३ रोजी सामंजस्य करार झालेला आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने ग्रामविकास विभागाने दिनांक ५ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या परिपत्रकान्वये मार्गदर्शक सुचना सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना निर्गमित केले आहेत.
(२) व (३) होय.

बी.बी.एन.एल. कंपनीकडून ऑप्टीकल फायबर नेटवर्क टाकण्यासाठीची पूर्व प्रक्रिया सुरु झाली आहे.
(४) मार्च, २०१६ पर्यंत राज्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये ऑप्टीकल फायबर नेटवर्कद्वारे ब्रॉडबॅण्ड देण्याचे बीबीएनएल कंपनीला उद्दीष्ट दिलेले आहे.

---

**गोदावरी पाटबंधारे महामंडळाने दिलेल्या अहवालानुसार जायकवाडी धरणात पाणी सोडण्याबाबत**

**(२४) २११५ (२३-१२-२०१४). श्री. भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जायकवाडी धरणात पाणी सोडण्याबाबत पाण्याचा सध्याचा साठा व वापर याबाबतचा अहवाल गोदावरी पाटबंधारे महामंडळाने शासनाला दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर अहवालानुसार पाणी सोडण्याबाबत काय निर्णय घेतला आहे,
(३) असल्यास, प्रत्यक्ष केव्हा व किती पाणी सोडण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१५) :**(१) होय.

(२) जायकवाडीच्या उर्ध्व भागातील मुळा व प्रवरा धरण समुहातून अनुक्रमे १०१.७५ व १२१.८७ द.ल.घ.मी. असे एकूण २२३.६२ द.ल.घ.मी. (७.८९ TMC) पाणी जायकवाडी करिता सोडणेबाबत आदेश निर्गमित केले.

(३) मुळा समुहातून व प्रवरा समुहातून दिनांक ०७.१२.२०१४ ते दिनांक २२.१२.२०१४ पर्यंत अनुक्रमे १०२.२३ द.ल.घ.मी. व ९९.५३ द.ल.घ.मी. असे एकूण २०१.७६ दलघमी पाणी सोडण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्धवत नाही.

---

## ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील पर्यटकांच्या वाहन प्रवेश संख्येत वाढ करण्याबाबत

**(२५) २११६ (२२-१२-२०१४). श्री. बंटी भांगडिया (चिमूर), डॉ. देवराव होळी (गडचिरोली), श्री. कृष्णा गजबे (आरमोरी), ॲड. संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील अंतर्गत मार्गामध्ये वाढ करण्यात येऊन प्रवेश करणा-या वाहनांची संख्येत वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे काय,

(२) असल्यास, या व्याघ्र प्रकल्पा अंतर्गत रस्ते हे संपूर्ण काळ सुरु असण्याच्या दृष्टीने पक्या स्वरुपात बनविण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पाला लागूर असलेल्या बफर झोन अंतर्गत येणा-या वनक्षेत्राचा उपयोग निसर्ग पर्यटन विकासाच्या दृष्टीने करण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, बफर क्षेत्रातील निसर्ग पर्यटनात स्थानिकांचा सहभाग वाढवून त्यांना रोजगारास प्राधान्य दिल्या जाणार आहे काय,

(५) असल्यास, या संपूर्ण विकासाचा निश्चित कालावधी विकासाची रुपरेषा काय आहे?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०३-२०१५) :** (१) ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात दररोज ११७ वाहनांना प्रवेश देण्यात येत होता. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या निर्देशानुसार ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे वन्यजीव व्यवस्थापनाकरिता - व्याघ्र संवर्धन योजना (Tiger Conservation Plan) सन २००८-२००९ ते २०१७-२०१८ या कालावधीकरीता कोअर, बफर आणि कॉरीडोर चा व्याघ्र संवर्धन आराखडा व निसर्ग पर्यटन आराखडा तयार करण्यात आला आहे. निसर्ग पर्यटन आराखडयामध्ये वाहन क्षमतेनुसार (Carrying Capacity) दररोज सकाळ व दुपार फेरी मिळून सुधारीत एकूण १३६ वाहनांची प्रस्तावित करण्यात येऊन केंद्र शासनास सदर आराखडा मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे.

स्थनिक सल्लागार समितीची मान्यता विचारात घेऊन प्रस्तावित वहन क्षमतेनुसार १३६ वाहनांना दि. १९.१२.२०१४ पासून प्रवेश देण्यात येत आहे.

(२) नाही.

(३) व (४) होय हे खरे आहे.

(५) बफर क्षेत्रात मोहर्ली येथे Interpretation Center ची स्थापना करणे, बफर क्षेत्रात रस्त्यांचे परिरक्षण करणे, बफर क्षेत्रात ७ पर्यटन सर्किट, ८ ठिकाणी निसर्ग मार्ग, ५० होमस्टे व ३ ठिकाणी बोटींगची सुविधा निर्माण करणे, बफर क्षेत्रात गाईड्सना प्रशिक्षण देणे, साईनेजेसचे निर्माण करणे इत्यादी विकासाची कामे करण्यात येणार असून त्यातून सुमारे ९०० पर्यटकांना दर दिवसाला प्रवेश देणे शक्य होणार आहे. सदर विकासाचा कालावधी ५ वर्षाकरिता आहे.

---

**गोडया पाण्यातील २०० हेक्टरच्या वरील तलावामध्ये ठेकेदारी पध्दतीने लिलाव करण्याच्या शासन निर्णयामध्ये बदल करण्याबाबत**

**(२६) २११७ (२७-०१-२०१५). श्री. बंटी भांगडिया (चिमूर), डॉ. देवराव होळी (गडचिरोली), श्री. कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोडया पाण्यातील २०० हेक्टरच्या वरील तलावामध्ये करण्यात येणारी मासेमारी खाजगी ठेकेदारांकडे मासेमारी करण्याकरीता ठेकेदारी पध्दतीने लिलाव करण्याच्या शासन निर्णयामध्ये बदल करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबीत आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शासन निर्णयामुळे मत्स्यव्यवसाय संस्थांना व्यवसायापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या शासन निर्णयाचामुळे अनेक छोटे मत्स्य व्यवसायीक रोजगारापासून वंचित राहिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर शासन निर्णय रद्द करण्यात यावा किंवा बदल करण्याच्या दृष्टीने काय कारवाई करण्यात येणार आहे वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, मत्स्य व्यवसाय संस्था व छोटे व्यवसायांना पर्यायी उपाययोजना करण्यात येणार आहे काय?

**श्री. एकनाथराव खडसे (१२-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.

तथापि दि. २६ /०६/२०१४ च्या शासन निर्णयान्वये नविन धोरण निश्चित करण्यात आलेले असून त्यास काही लोकप्रतिनिधी / मच्छिमार संघटना यांनी दिलेल्या निवेदनांच्या अनुषंगाने शासनाच्या दि. १६.०७.२०१४ च्या आदेशान्वये स्थगिती देण्यात आलेली आहे.
(२) नाही.

सुधारीत तलाव ठेका धोरणास देण्यात आलेल्या स्थगिती मुळे राज्यातील तलाव ठेका प्रक्रीया थांबू नये व मच्छिमारांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होवू नये या बाबींचा विचार करुन तलाव ठेका प्रक्रीया दि. १५.१०.२००१ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार व सदर शासननिर्णयात वेळोवेळी केलेल्या सुधारणानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात जलविद्युत प्रकल्पाचे अनेक प्रस्ताव विविध मंजुरीकरीता**
**शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(२७) २११८ (२२-१२-२०१४). श्री. बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जलविद्युत प्रकल्पाचे अनेक प्रस्ताव विविध मंजुरी करीता माहे ऑक्टोबर, २०१४ पर्यतची शासनाकडे प्रकरणे प्रलंबीत असल्यामुळे सर्व जलविद्युत प्रकल्पांच्या मूळ किंमतीत वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पांच्या वाढीव किंमतीच्या मान्यतेकरीता प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,उक्त प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (२७-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यावरील अध्ययनासाठी चिमूर तालुक्यातील (जि.चंद्रपूर)**
**गोंदोडा येथे अध्ययन केंद्र मंजूरीबाबत**

**(२८) २१२१ (२२-१२-२०१४). श्री. बंटी भांगडिया (चिमूर), डॉ. देवराव होळी (गडचिरोली), श्री. कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाच्या साहित्यावरील अध्ययनाकरिता अध्ययन केंद्र मंजूर करण्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक ३ ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्या सुमारास पत्राद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चिमूर तालुक्यातील गोंदोडा गुफे येथे अध्ययन केंद्र मंजूरीकरीता मा.मुख्यमंत्री महोदयांकडून केंद्र शासनाकडे मंजुरीस्तव प्रस्ताव प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवून अध्ययन केंद्र सुरु करण्याचा निश्चित कालावधी, व सदरील प्रस्तावाचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-०२-२०१५)** :(१) होय.
(२) नाही.
(३) दि.३ ऑगस्ट, २०१२ च्या पत्राच्या अनुषंगाने सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या सूचना संचालक, उच्च शिक्षण, पुणे व संबंधित विद्यापीठे यांना देण्यात आलेल्या आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर व चंद्रपूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागातील रिक्त पदांबाबत**

**(२९) २१२३ (२२-१२-२०१४). श्री. बंटी भांगडिया (चिमूर), डॉ. देवराव होळी (गडचिरोली), श्री. कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर प्रादेशिक मंडळात वर्ग २ व ३ ची अनेक पदे रिक्त असून या पदांच्या भरती बाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यातील रिक्त असलेल्या पदाबाबत शासन तात्काळ निर्णय घेऊन पद भरती करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीनुसार दोन्ही ठिकाणी लवकरात लवकर पदे भरती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदर पद भरती कधीपर्यंत भरण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०२-२०१५)** :(१) नाही.
(२), (३) व (४) भरती प्रक्रिया सुरु असून निवड प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

---

**विदर्भाच्या मागासलेल्या तालुक्यांचा अनुशेष भरुन काढण्यासाठी**
**विशेष समिती गठण करणेबाबत**

**(३०) २१२५ (२२-१२-२०१४). श्री. बंटी भांगडिया (चिमूर), डॉ. देवराव होळी (गडचिरोली), श्री. कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील मागासलेल्या तालुक्यांचा अनुशेष भरुन काढण्याकरिता विशेष समितीचे गठन करण्याचे प्रस्तावित आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावित समिती अंतर्गत रस्त्यांवरील पुलाचे बांधकाम करण्याकरिता निधीचे प्रयोजन करण्यात येणार आहे काय,
(३) असल्यास, विदर्भातील मागासलेल्या तालुक्यांचा अनुशेष भरुन काढण्याकरीता तयार केलेल्या समितीच्या प्रस्तावाची रुपरेषा काय,

(४) नसल्यास, मागासलेल्या तालुक्यांचा अनुशेष भरुन काढण्याकरीता पर्यायी उपाययोजना काय?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०१-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोसीखुर्द उजवा कालवा घोडाझरी शाखेतंर्गत कालव्याच्या कामाचे अंदाजपत्रक जास्त किंमतीने प्रस्तावित केल्याबाबत**

**(३१) २१२६ (२४-१२-२०१४). श्री. बंटी भांगडिया (चिमूर), डॉ. देवराव होळी (गडचिरोली), श्री. कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) गोसीखुर्द उजवा कालवा घोडाझरी शाखेअंतर्गत २६ ते ५५ कि.मी. पर्यतच्या कालव्याच्या कामाचे अंदाजपत्रक वाजवी पेक्षा जास्त किंमतीने प्रस्तावित केले आहे, हे खरे आहे काय, ?
(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१५) :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील प्रभू राजारामजी शैक्षणिक संस्थांच्या शाळांमधील गैरकारभाराबाबत**

**(३२) २१२७ (२२-१२-२०१४). श्री. बंटी भांगडिया (चिमूर), डॉ. देवराव होळी (गडचिरोली), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील प्रभू राजारामजी शैक्षणिक संस्थेमार्फत चालविण्यात येणा-या चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये अनागोंदी कारभार सुरु असल्याबाबतची तक्रार मा.शिक्षण सह संचालक, नागपूर यांना प्राप्त झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संस्थेत नियुक्त असलेले कर्मचारी हे नियुक्त असलेल्या स्थानी कामच करीत नाही तसेच संस्थेची सर्व कागदपत्रे संस्थेच्या कार्यालयात न ठेवता सचिवांच्या घरात ठेवलेली असतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संस्थेमार्फत चालविण्यात येणा-या सर्व शाळांची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने अहवाल सादर करण्यात आलेला आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही. तथापि, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), गडचिरोली यांचेकडे गडचिरोली जिल्ह्यातील शाळांबाबत तक्रार प्राप्त झालेली आहे.
(२) व (३) याप्रकरणी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पास लागुन असलेल्या शेताच्या संरक्षणाबाबत**

**(३३) २१२८ (२२-१२-२०१४). श्री. बंटी भांगडिया (चिमूर), डॉ. देवराव होळी (गडचिरोली), श्री. कृष्णा गजबे (आरमोरी), श्री. सुरेश धानोरकर (वरोरा), श्री. समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाला लागुन असलेल्या शेतांना कुंपण लावण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबीत आहे काय,
(२) असल्यास, या अभयारण्यातील जंगली पशु हे लागुन असलेल्या शेतातील पिकांचे नेहमीच प्रचंड नुकसान करीत असतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पाला लागुन असलेल्या शेतांना सौर कुंपण लावण्याकरीता विशेष प्रयोजन करण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, सौर कुंपण प्रकल्पाबाबतची योजना काय आह?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०२-२०१५)** :(१) हे खरे नाही.
(२) सन २०१३-१४ ते सन २०१४-१५ (डिसेंबर, २०१४ अखेर) पर्यंत वन्यप्राण्यांनी शेतपिकांचे नुकसान केलेली ४८७ प्रकरणे असून त्यामध्ये रु.१८,५४,३९१/- इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आदा करण्यात आली आहे.
(३) सन २०११-१२ ते सन २०१३-१४ या कालावधीत ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाला लागून असलेल्या गावामध्ये एकूण २९ कि.मी. सौर कुंपण लावण्यात आले आहे.तसेच सन २०१४-२०१५ मध्ये ताडोबा फाउंडेशन अंतर्गत बफर क्षेत्रातील एका गावाकीरता ६ कि.मी. लांबीचे सौर कुंपण करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) वन्य प्राण्यापासून होणारी पिक नुकसान नियंत्रित करण्यासाठी शेतकऱ्यांची मागणी प्रमाणे व उपलब्ध अनुदानाचे अधीन राहून सौर कुंपण केले जाते. त्यामुळे वन्यप्राणी शेतात शिरण्यास काही प्रमाणात प्रतिबंध होतो.

---

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जीवनावरील माहितीपट व रचलेल्या ग्रामगीतेचा समावेश शालेय शिक्षण पाठयक्रमात करण्याबाबतचा प्रस्ताव**

**(३४) २१२९ (२२-१२-२०१४). श्री. बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जीवनावरील माहितीपट व त्यांनी रचलेल्या ग्रामगीतेचा समावेश शालेय शिक्षण पाठयक्रमात करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तुकडोजी महाराजांनी रचलेल्या ग्रामगीतेमध्ये स्वच्छता व स्वयंपूर्ण ग्रामयोजने विषयी समग्र माहिती आहे जी शालेय विद्यार्थ्यांकरीता फार उपयुक्त आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विषयांचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२३-०२-२०१५) :**(१), (२) ग्रामगीता जीवन विकास परीक्षा संपूर्ण महाराष्ट्रात लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे. कमीतकमी परीक्षा घेण्याचे शासनाचे धोरण आहे. परंतु ग्रामगीतेतील स्वच्छता विषयक घटकांच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमेतर उपक्रमांतून प्रसार करता येईल.

(३) व (४) प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रमामध्ये परिसर अभ्यास भाग १ व आरोग्य व शारीरीक शिक्षण या दोन विषयातून वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेचा समावेश करण्यात आलेला आहे. इ.६ वी च्या नागरिकशास्त्र या विषयामध्ये ग्रामपंचायत रचना व कार्ये यांचा समावेश आहे.

इ.९ वीचे हिंदी लोकभारती, इ.१० वीचे मराठी आंतरभारती व इ.१२ वीच्या हिंदी युवकभारतीमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील मुळ गीतांचा समावेश केलेला आहे.

---

**राज्यातील औष्णिक विद्युत केंद्रातील चिमण्यांतून निघणा-या धुरामध्ये सल्फर व पा-याचे प्रमाण हे मर्यादेपेक्षा जास्त प्रमाणात असल्याबाबत**

**(३५) २१३० (२२-१२-२०१४). श्री. बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औष्णिक विद्युत केंद्रातील चिमण्यांतून निघणा-या धुरामध्ये सल्फर व पा-याचे प्रमाण हे मर्यादेपेक्षा जास्त प्रमाणात असल्यामुळे ते थांबविण्याकरीता विशेष उपाययोजना प्रस्तावित आहे काय,

(२) असल्यास, प्रदुषण मंडळाने ठरवून दिलेल्या मानकापेक्षा जास्त धुरामुळे होणा-या वायु

प्रदुषणास जबाबदार असणा-या चिमण्यांवर प्रतिबंधात्मक कारवाईत तो धूर रोखण्याकरिता काय उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रामदास कदम (१०-०३-२०१५) :** (१) व (२) नाही.

औष्णिक विद्युत केंद्राच्या धुरांड्यामधुन उत्सर्जित होणारे सल्फर डाय ऑक्साईडचे नियंत्रण करण्याकरिता धुर उंच धुरांड्यातून सोडण्यात येतो. परंतु पारा या घटकाकरिता मर्यादा विहित केलेली नाही.

धुरांड्यातून निघणाऱ्या सल्फर डाय ऑक्साईड विहित उंचीवर जाण्याकरिता धुरांड्याची उंची ठरवून दिली जाते. तसेच ज्या इंधनामध्ये सल्फर डाय ऑक्साईडचे प्रमाण अधिक असते, त्या ठिकाणी, तसेच संवेदनशील ठिकाणी अत्याधुनिक हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा जसे - फ्ल्यू गॅस डिसल्फरायझेशन (एफजीडी) सुध्दा बसविण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महिला व बालकल्याण विभागातून वाटप करण्यात येणारा पाकीटबंद आहाराबाबत**

**(३६) २१३६ (२२-१२-२०१४). श्री. बंटी भांगडिया (चिमूर), डॉ. देवराव होळी (गडचिरोली), श्री. कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालकल्याण विभागातुन लहान मुलांना वाटप करण्यात येणार पाकीटबंद अहाराबाबत नविन धोरण अवलंबिण्यात येणार आहे काय,
(२) असल्यास, पाकीटबंद आहाराची मुदत ही केवळ ९० दिवस असल्यामुळे दुर्गम आदिवासी भागात पाकीटबंद आहार पुरविण्याकरीता पर्यायी व्यवस्था करण्यात येणार आहे काय,
(३) असल्यास, अती दुर्गम भागातील पाकीटबंद आहराचे वाटप स्थानिक जिल्हा स्थरावरुन कंत्राट देऊन करण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, पर्यायी उपययोजना कोणती ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०२-२०१५) :**(१) नाही.

केंद्र शासनाने दि.२४/२/२००९ च्या पत्रान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचना आणि मा.सर्वोच्च न्यायालयाचे दि.२२/०४/२००९ च्या आदेशानुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील सर्व बालके, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता आणि ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील तीव्र कमी वजनाची बालके यांना घरपोच आहार (THR) तसेच ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांना सकाळचा नास्ता व गरम ताजा आहार पुरवण्याच्या सूचना दि.२४/८/२०० च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) THR आहाराची Self Life ही १२० दिवस (४ महिने) एवढी आहे. THR आहाराचा पुरवठा १ ते २ महिन्यासाठी लाभार्थ्यांना करण्यात येतो. यामुळे सदरचा आहार कालबाह्य होण्यापूर्वी संपत असल्यामुळे पर्यायी व्यवस्था करण्याचा पप्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हास्तरीय आहार समितीमार्फत स्थानिक बचत गट/महिला मंडळ/ग्राम समुदाय यांचेकडून THR आहार पुरवठ्यासाठी प्रकल्पनिहाय अर्ज मागवून निवड प्रक्रिया करण्यात येत आहे. सध्यस्थिती ५५३ प्रकल्पांपैकी ३१२ प्रकल्पांमध्ये स्थानिक महिला बचत गट/महिला मंडळ/ ग्राम समुदाय यांचेमार्फत THR आहार पुरवठा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निमगांव लघु प्रकल्प (ता. तिरोडा जिल्हा गोंदिया) वनजमिनीचे संपादन प्रस्तावास अंतिम मंजुरीबाबत**

**(३७) २१५० (२२-१२-२०१४). श्री. विजय रहांगडाले (तिरोडा), श्री. बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निमगांव लघु प्रकल्प (ता. तिरोडा जिल्हा गोंदिया) वनजमिनीचे संपादन प्रस्तावास अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर प्रकल्पाचे उर्वरित शिर्ष कामे व कालव्याचे कामे दोन वर्षात पूर्ण करणे नियोजित असून सुध्दा प्रकल्पाचे वनजमिनीचे संपादन प्रस्तावास अंतिम मंजुरी का मिळाली नाही, हे खरे आहे काय
(२) असल्यास, १३ गावांच्या शेतकऱ्यांना केव्हापर्यंत लाभ मिळणार आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-०२-२०१५) :** (१), (२) व (३) निमगांव लघु प्रकल्प (ता.तिरोडा, जिल्हा गोंदीया) करीता १४१.६२ हेक्टर वनजमिन वळतीकरणाबाबतच्या प्रस्तावासा केंद्र शासनाने दि.२३/०८/२००६ रोजी काही अटींच्या अधीन राहून तत्वत: मान्यता प्रदान केली आहे. राज्य शासनाने दि.०४/०३/२००९ च्या पत्रान्वये अटी पूर्तता अहवाल केंद्र शासनास सादर केला, तद्नंतर केंद्र शासनाने दि.२५/०९/२०१३ च्या पत्रान्वये FRA- २००६ ची पूर्तता करण्याबाबत कळविले असून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी दि.०२/१२/२०१४ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी गोंदिया आणि प्रकल्प यंत्रणेस पूर्तता करण्यास कळविले आहे. प्रकल्प यंत्रणेकडून पूर्तता झाली नसलेने सदर प्रस्ताव केंद्र शासनाकडून अंतिम मान्यता प्रदान करण्यात आलेली नाही.

---

**तिरोडा (जि.गोंदिया) येथील शेतकऱ्यांचे कृषी पंपाची वीज जोडणी स्थगित केल्याबाबत**

**(३८) २१५१ (२७-०१-२०१५). श्री. विजय रहांगडाले (तिरोडा), श्री. बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिरोडा (जि.गोंदिया) येथील गोरगरीब शेतकऱ्यांचे १८९ कृषी पंपाचे एम.एस.ई.बी. ने सन २०१२ पासून वीज जोडणी स्थगित केली असून शेतकऱ्यांना वीज नसल्याने सदरील शेतकऱ्यांच्या उपजिविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सदरील शेतकऱ्यांचे कृषी पंपाचे कनेक्शन पूर्ववत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यामध्ये नागरी सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून सामान्य नागरीकांच्या ठेवी बुडाल्याबाबत**

**(३९) २१५७ (२४-१२-२०१४). श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये नागरी सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून सामान्य नागरीकांच्या ठेवी बुडल्यामुळे संख्या अडचणीत आल्यामुळे नागरी सहकारी पतसंस्थांना ठेवीदारांचे पैसे देण्यासाठी शासनाने आर्थिक पॅकेज दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या पॅकेज परत फेडी बाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे,
(३) सदरील पतसंस्थांना ठेवीदाराचे पैसे देण्यासाठी आर्थिक पॅकेज उपलब्ध करुन दिल्या नंतर १ वर्षाच्या आत सदर संस्थांनी पॅकेजची रक्कम शासनाला परत केली नाहीतर संचालक मंडळ यांच्या प्रॉपर्टीतून किंवा संस्थैंचा प्रॉपर्टीतून वसूल करणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०२-२०१५) :**(१) होय.
(२) पॅकेज मधील निध परतफेड न करणा-या संस्थांवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम -१५५ अन्वये कारवाई चालू आहे. रु. ५६.३३ कोटीचे मुल्यांकन असलेल्या संस्थाच्या स्थावर मालमत्तांवर शासनाचा बोजा निर्माण केला असून सदर मालमत्तांच्या विक्रीची कार्यवाही चालू आहे.
(३)अडचणीतील पतसंस्थांना रु.२०० कोटी एक वर्षासाठी बिनव्याजी अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले होते. सदर अर्थसहाय्यातून ३३९ पतसंस्थांतील पात्र ठेवीदारांना रु. १७३.४९ कोटीचे वाटप केले आहे. त्यापैकी दि. ३१.१२.२०१४ अखेर रु. १९.५५ कोटी इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम वसुल करणेबाबत संबंधीत संस्थांवर कलम-१५५ अन्वये कार्यवाही करुन तसेच संस्थांच्या मालमत्ता विक्रीतून वसुली करणेबाबत जिल्हा उपनिंबधक, सहकारी संस्था यांचेमार्फत प्रयत्न सुरु आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गारगोटी-कोल्हापूर हा रहदारीचा रस्ता सात मिटर रूंदीचा करण्याबाबत**

**(४०) २१५९ (२२-१२-२०१४). श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गारगोटी-कोल्हापूर हा रस्ता प्रचंड रहदारीचा असून सदरच्या रस्त्याने रोज हजारो वाहने रहदारी करीत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्याची रुंदी कमी असल्याने या रस्त्यावर वारंवार अपघात होत असल्यामुळे सदरचा रस्ता सात मिटर रूंदीचा करण्यात यावा यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांचेकडे मागणी केली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागणीनुषंगाने सदरच्या रस्त्याचे काम तातडीने होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०२-२०१५) :** (१) व (२) होय.

(३) सदर रस्त्याचे काम दिनांक १३.८.२०१४ अन्वये केंद्रिय मार्ग निधी अंतर्गत केंद्र शासनाकडे प्रस्तावित करण्यात आले असून त्यास अद्‌यापि मान्यता प्राप्त झालेली नाही. सदर रस्त्याचे काम मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यामध्ये अपंग लाभार्थी इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेपासून वंचित राहिले असल्याबाबत**

**(४१) २१७३ (२२-१२-२०१४). श्री. संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा केंद्र शासनाने अपंगासाठी इंदिरा गांधी राष्ट्रीय अंपग निवृत्तीवेतन योजना सुरु केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी घातलेल्या जाचक अटीमुळे हजारो अपंग लाभार्थी योजनेपासून वंचित असल्याचे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कुटुंबाचे नाव दारीद्रयरेषेखालील कुटुंबाच्या यादीत समाविष्ट असावे व लाभार्थी ८० टक्के अपंग असावा या जाचक अटीमुळे लाभार्थी वंचित राहतात हे खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्र शासनाच्या अटी राज्यातील अटीप्रमाणे करणे बाबत शासनस्तरावर केंद्राकडे पाठपुरावा करण्यात आला आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले (०३-०३-२०१५)** :(१) केंद्र शासनाची सदर योजना केवळ पुणे जिल्ह्यापुरती नसून संपूर्ण राज्यासाठी लागू आहे.
(२) सदर योजनेतील लाभार्थी योजनेपासून वंचित असल्याचा कोणताही अहवाल जिल्हा प्रशासनाकडून शासनास प्राप्त नाही.
(३) या योजनेतील अटींची पूर्तता करणारे कोणतेही लाभधारक योजनेपासून वंचित राहत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(४) केंद्र शासनाच्या Performance Review Committee च्या बैठकीत या योजनेतील ८० टक्के अपंगत्वाची अट राज्यातील संजय गांधी निराधर अनुदान योजनेमधील अटीनुसार ४० टक्के अपंगत्व अशी करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हा-पुणे सातारा या रस्त्यांच्या सहा पदरीकरण करण्याच्या कामाबाबत**

**(४२) २१७७ (२७-०२-२०१५). श्री. संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हा-पुणे सातारा रस्त्याचे देहूरोड ते सातारा या सुमारे १४० किलोमीटरच्या रस्त्याचे सहा पदरीकरण काम करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार मधील पुणे सातारा टप्प्यातील रस्त्याच्या सहापदरीकरणाचे ऑक्टोबर, २०१० मध्ये सुरू झालेले काम मार्च २०१३ पर्यंत पुणे होणे अपेक्षित होते, हे ही खरे आहे,
(३) असल्यास, या कालावधीत हे काम पूर्ण न झाल्याने पुढे टप्प्याटप्प्याने वर्षभर मुदत देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच रस्त्याच्या कंत्राटदाराकडून पुन्हा दीड वर्षाची मुदतवाढ मागण्यात येत आहे त्यामुळे पुन्हा अडीच वर्षाच्या कामाला तब्बल अडीच वर्षाची मुदतवाढ अशी स्थिती निर्माण झाली असून याबाबत शासन स्तरावर कोणता निर्णय घेण्यात आला आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०३-२०१५)** :(१) होय.
(२) होय.
(३) होय.
स्वतंत्र सल्लागार मार्फत माहे एप्रिल २०१५ पर्यंत मुदतवाढ देण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.
(४) दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१४ रोजी पुरक करारनामा करण्यात आलेला आहे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ पर्यंतच्या मुदतवाढीस मंजूरी दिली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील दुय्यम निबंधक कार्यालयातील कर्मचा-यांची संख्या अपूरी असल्याबाबत

**(४३) २१७९ (२२-१२-२०१४). श्री. संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा - मावळ तालुक्यातील दुय्यम निंबधक कार्यालयातील कर्मचा-यांची संख्या अपुग्र असल्याने आणि इंटरनेट यंत्रणेत बिघाड होत असल्याने नागरीकांना ताटकळत उभे रहावे लागते हे खरे आहे काय,

(२) कार्यालयात दुय्यम निंबधक पद १ वरिष्ठ लिपिक पद १, कनिष्ठ लिपीक पद २ व शिपाई पद १ असे ५ पदे मंजुर आहेत त्यापैकी केवळ दुय्यम निंबधक १ व शिपाई १ असे २ पदे कार्यरत आहे उर्वरित पदे रिक्त आहेत हे ही खरे आहे काय,

(३) मावळ तालक्यातील जमिनीचे भाव वाढत आहेत येथे दैनदिंन जमिन खरेदीचे व्यवहार मोठया प्रमाणात सुरु असतात व्यवहारासाठी आवश्यक असलेल्या सुची क्रमांक दोन पुस्तकांची जिर्णावस्था झाली आहे तसेच १९९३, १९९५,२००,२१२ व २०१३ या वर्षाचे सुचि क्रमांक दोन पुस्तिका उपलब्ध नाही हे खरे आहे काय,

(४) दुय्यम निंबधक कार्यालय प्रशस्त जागेत व नागरीकांसाठी आवश्यक सुविधेसह उपलब्ध होणे बाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१२-०३-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) मावळ तालुकयात अनुक्रमे वडगांव-मावळ, लोणावळा व तळेगाव अशा एकूण ३ ठिकाणी दुय्यम निबंधक कार्यालये कार्यरत आहेत. यापैकी दुय्यम निबंधक श्रेणी-१, लाणावळा या कार्यालयात कनिष्ठ लिपीक (१) व शिपाई (१) ही दोन पदे रिक्त आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) शासकीय जागा मिळणेसाठी मा.जिल्हाधिकारी व मा.तहसिल कार्यालयाकडे पाठपुरावा सुरु आहे. सध्या ज्या ठिकाणी दुय्यम निबंधक कार्यालये आहेत त्या कार्यालयात नागरिकांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध आहेत.

---

### खेड (जि.पुणे) तालुक्यातील राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु यांच्या जन्मस्थळाची झालेली दुरवस्था

**(४४) २१८० (२२-१२-२०१४). श्री. संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील राजगुरुनगर येथील हुतात्मा शिवराम हरि राजगुरु यांच्या जन्मस्थळ स्मारकाचे पाच वर्षापासून काम सुरु असुन जन्मस्थळाची जमीन खचल्याने हुतात्मा राजगुरु स्मारकाला मोठा धोका निर्माण झाला आहे तसेच थोरला वाडा, देवघर आणि व्यायाम घराचीही दुरवस्था झाली असून पुरातत्व विभाग आणि राज्य शासनाकडून निधी न आल्याने स्मारकाचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्मारकाच्या कामातील भ्रष्टाचाराबाबत शासनाने सखोल चौकशी करण्यासाठी त्रिस्तरीय समिती नेमली असून या चौकशीत का निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) पुरातत्व विभाग व शासनाकडून हुतात्मा राजगुरु स्मारकासाठी तात्काळ निधी उपलब्ध होणे बाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०२-२०१५) :**(१) नाही.

हुतात्मा राजगुरु जन्मस्थळ राजगुरुनगर या राज्य संरक्षित स्मारकाच्या खालून जाणा-या गटारीमुळे जन्मस्थळाची जमीन खचल्याने स्मारकास धोका निर्माण झाला होता. तथापि सरद ठिकाणची दुरुस्ती करण्यात आली आहे.
(२) या स्मारकाच्या कामाची तपासणी करणे, उणिवा निदर्शनास आणणे, त्याचप्रमाणे या स्मारकाच्या भविष्यात करावयाच्या अत्यावश्यक कामांबाबत पुरातत्व संचालनालयास अहवाल सादर करणेबाबत त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या अहवालानुसार दोषी अधिकारी व कर्मचा-यांवर शिस्तभंगविषयक कार्यवाही करुन शिक्षा बजविण्यात आल्या आहेत.
(३) सदर स्मारकाच्या जतन व दुरुस्ती कामाकरीता निधी उपलब्ध असून स्मारकाचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### लोणावळा (जि.पुणे) या पर्यटन नगरीचे सुयोग्य नियोजन ठेवण्याबाबत

**(४५) २१८१ (२२-१२-२०१४). श्री. संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील ५५ हजार लोकसंख्या असणा-या लोणावळा शहरामध्ये सुट्ट्यांच्या दिवशी एकाच वेळी लाखो पर्यटक या शहरात दाखल होतात, परंतु वाहतूक शाखेवर नियंत्रण ठेवण्यासाठी एकही अधिकारी लोणावळा शहर पोलीस ठाण्यात उपलब्ध नाही , किमान १५ पोलीस व १० वॉर्डनची आवश्यकता असताना केवळ १० वाहतूक पोलीस व ३ वॉर्डन नेमणूकीसाठी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०२-२०१५) :** (१), (२) व (३) लोणावळा शहर पोलीस ठाणे येथे १ पोलीस अधिकारी, १२ पोलीस कर्मचारी व ६ ट्रॅफिक वॉर्डनची नेमणूक करण्यात आली आहे. लोणावळा पोलीस ठाण्यास नियुक्त पोलीस अधिकारी व कर्मचा-यांच्या मदतीने वाहतूक सुरळीत ठेवली जाते. तसेच इतर मोठया बंदोबस्ताच्यावेळी जास्तीत जास्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात येते.

---

**मावळ (जि. पूणे) तालुक्यातील पोलीस पाटीलांची रिक्त पदे भरण्याबाबत.**

**(४६) २१८५ (१५-०१-२०१५). श्री. संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ(जि. पूणे) तालुक्यातील सुमारे १७० गावांना पोलीस पाटील पदे मंजूर असतांना केवळ ३८ गावांत पोलीस पाटील कार्यरत आहे,

(२) मावळ तालुक्यातील पोलीस पाटलांची रिक्त पदे भरणे बाबत शासनाचे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०१५) :** (१) मावळ तालुक्यामध्ये १८४ पोलीस पाटलांची पदे मंजूर असून त्यापैकी ५२ पदांवर पोलीस पाटील कार्यरत आहेत.

(२) पुणे जिल्हयात महसूल विभागाचे पुर्नरचना करण्यात आलेली आहे. पोलीस पाटील पदाचे आरक्षण लागू करताना उपविभाग हा एक गट समजला जातो. त्यामुळे नव्याने निर्माण झालेल्या उपविभागातील पोलीस पाटीलांची बिंदुनामावली (रोस्टर) तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. बिंदुनामावली पडताळणीचे कामकाज पूर्ण झाल्यानंतर पोलीस पाटील भरती प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भातील खारपाणपट्टयात येत असलेले प्रकल्प कालव्याऐवजी**
**बंद पाईप प्रणाली करण्याबाबत**

**(४७) २१९१ (२४-१२-२०१४). श्री. रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील खारपाणपट्टयात येत असलेले प्रकल्प कालव्याएेवजी बंद पाईप प्रणाली करण्याबाबत दिनांक ९ ऑगस्ट, २०११ रोजी तत्कालीन जलसंपदा राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) सदर प्रस्तावास दिनांक ४ डिसेंबर, २०१३ रोजी तत्कालीन जलसंपदा मंत्री यांच्या

अध्यक्षतेखाली झालेल्या नियामक मंडळाच्या सभेमध्ये मान्यता प्रदान करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, एक वर्षाचा कालावधी लोटून सुध्दा अद्यापपर्यंत सदर कामास सुरुवात न होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, विलंबास जबाबदार असणा-या अधिका-यांवर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच उक्त प्रणालीची अंमलबजावणी त्वरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, त्यानुसार सदरील काम केंव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे व या कामासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०३-२०१५)** :(१) होय.
(२) नियामक मंडळाचे दिनांक ४/१२/२०१३ चे ५४ व्या बैठकीमध्ये उमा बॅरेज, पूर्णा बॅरेज नं. २ (नेरधामणा) व घुंगशी बॅरेज या विदर्भातील खारपाणपट्टयात येत असलेल्या प्रकल्पामध्ये कालव्याऐवजी बंद पाईप लाईन द्वारे काम करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.
(३) कामास सुरुवात करण्यापुर्वी दि. १० जुन, २०१३ चे शासन निर्णयातील परिच्छेद ४ नुसार सदर बदलास सुधारीत प्रशासकीय मान्यता घेण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.
(४) विलंब झालेला नाही.
वरीलप्रमाणे मान्यतेनंतर प्रकल्पाची कामे निधी उपलब्धतेनुसार पूर्ण करावयाचे नियोजित आहे.
सदर प्रकल्पांवर सन २०१४-१५ मध्ये घुंगशी बॅरेज करीता रु. ७५ कोटी, पुर्णा बॅरेज -२ (नेरधामणा) करीता रु. १२० कोटी व उमा बॅरेज करीता रु. ३० कोटी निधी उपलब्ध आहे.
(५) विलंब झालेला नाही.

---

## अकोला जिल्हयात असलेली परंतू इतर जिल्हयातील जलसंपदा मंडळाकडे असलेली बॅरेजस अकोला पाटबंधारे मंडळाकडे हस्तांतरण करण्याबाबत

**(४८) २१९३ (२२-१२-२०१४). श्री. रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्हयात असलेली परंतू इतर जिल्हयातील जलसंपदा मंडळाकडे असलेली बॅरेजस अकोला पाटबंधारे मंडळाकडे हस्तांतरण करण्याबाबत निर्णय दिनांक ९ ऑगस्ट,२०११ रोजी तत्कालीन राज्यमंत्री पाटबंधारे विभाग यांच्या अध्यक्षतेत झालेल्या बैठकीमध्ये झाला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अकोला जिल्हयातील काटेपूर्णा बॅरेज बुलढाणा मंडळाकडे व घुंगशी बॅरेज अमरावती मंडळाकडे असून अद्याप पर्यंत हस्तांतरीत करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) अकोला जिल्ह्यातील लघु पाटबंधारे विभाक क्र.२ अकोला या विभागाकडे सद्यःस्थिती अत्यंत अल्प कार्यभार असल्यामुळे उपरोक्त दोन्ही बॅरेज यांच्याकडे हस्तांतर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच आतपर्यंत हस्तांतरणास विलंब करणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२-०२-२०१५)** :(१) होय.
(२) प्रशासकीय दृष्टीने तसेच प्रकल्प ग्रस्तांना सोईचे व्हावे म्हणून काटेपुर्णा व घुंगशी बॅरेज या प्रकल्पाची कामे अनुक्रमे बुलढाणा पाटबंधारे प्रकल्प मंडळ व अमरावती पाटबंधारे प्रकल्प महामंडळातर्गत सुरु आहेत.
(३) व (४) अकोला जिल्ह्यातील लघु पाटबंधारे विभाग क्र. २ अकोला या वि भागाकडे सद्यःस्थितीत एकूण १३ प्रकल्पाची कामे आहेत. तसेच मुद्दा क्र. (२) मध्ये नमूद कारणास्तव दोन्ही बॅरेज हस्तांतरणाबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

---

## जळगांव शहरातील प्रामुख्याने प्रिप्राळा जवळ असलेल्या रेल्वे गेटवर ओव्हर ब्रीज बांधण्याबाबत

**(४९) २१९६ (२२-१२-२०१४). श्री. सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव शहरातील प्रामुख्याने प्रिप्राळा जवळ असलेल्या रेल्वे गेटवर आेव्हर ब्रीज बांधण्याचा प्रस्ताव शासनाकडे अनेक दिवसापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ओव्हर ब्रीज बांधण्यासंबंधी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०१५)** :(१), (२) व (३) सदर ठिकाणी रेल्वे उड्डाणपूल बांधण्याच्या कामाचे अंदाज पत्रक व आराखडे मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांच्याकडे छाननीकरिता पाठविण्यात आले आहेत. उक्त छाननीकरिता आवश्यक असलेले शुल्क निधीच्या उपलब्धतेनुसार अदा करण्याची कार्यवाही जळगाव महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

---

**मालेगांव (जि. नाशिक) येथील बॉम्बस्फोटातील निरपराध आरोपींच्या सुटकेबाबत**

**(५०) २२०५ (२२-१२-२०१४). ॲड. वारीस पठाण (भायखळा), श्री. इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मालेगांव (जि. नाशिक) येथील माहे सप्टेंबर, २००६ मध्ये वा त्यासुमारास झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणी संशयावरुन अटकेत असलेल्या निरपराध मुस्लीम तरुणांना अनेक वर्षापासून विनाचौकशी डांबण्यात आल्याचे तसेच एन.आय.ए च्या चौकशीत निर्दोष असल्याचे सिध्द झाल्याने त्यांना कायमस्वरुपी/जामिनावर मोकळे सोडण्याची मागणी लोकप्रतिनिधी, विविध सामाजिक धार्मिक संघटनांचे पदाधिकारी, जागरुक नागरिक यांनी मा.मंत्री (गृह), मा.राज्यमंत्री (गृह), मा.पोलीस महासंचालक (महा.राज्य) यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनातर्फे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, सदरील कैदयांच्या पुनर्वसनासाठी शासन कोण्ता निर्णय घेणार आहे तसेच दोषी अधिका-यांविरोधात कोणती प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, याप्रकरणी विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०२-२०१५) :**(१) कुल जमाते तंजीम मालेगाव, रझा अकादमी, मुंबई व लोकप्रतिनिधी यांचे शासनाकडे अर्ज प्राप्त झाले आहेत. परंतु या प्रकरणी पोलीस उप आयुक्त, दहशतवाद विरोधी पथक, मुंबई यांनी दि. २१ /१२/२००६ रोजी ९ ओरापी व ४ फरार आरोपी यांचे विरोधात चार्जशीट दाखल केले होते. तद् नंतर तपास सी.बी.आय.कडे गेला आणि त्यांनी सुध्दा या आरोपींवर चार्जशीट दाखल केले. तद् नंतर तपास एन.आय.ए.कडे गेला आणि एन.आय.ए.ने. दि. २२/५/२०१४ रोजी ४ वेगळ्या आरोपीं विरोधात चार्जशीट दाखल केले तसेच ४ आरोपींना फरारी दाखविले. दि. ५/११/२०११ रोजी ९ आरोपींना जामीन मिळाला आहे. या आरोपींनी सदर गुन्ह्यातून मुक्त होण्यासाठी मा.मोक्का न्यायालय, मुंबई येथे अर्ज सादर केले असून ते न्यायालयात प्रलंबित आहेत.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.